कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/गोमुदि/२०२३–२४/२०६९
दि.१५/१२/२०२३

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी गोवा व इन्स्टिटय़ूट मिनेझिस ब्रागांझा यांच्या संयुक्त विद्यामाने गोवा मुक्ती दिनाप्रित्यर्थ मंगळवार दि. १९ डिसेंबर २०२३ रोजी सायं. ४.०० वाजता इन्स्टिटय़ूट मिनेझिस ब्रागांझा सभागृह, पणजी येथे भारतीय शास्त्रीय संगीत व वादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमांतर्गत श्रीमती सम्राज्ञी आईर व श्री. सचिन तेली शास्त्रीय गायन सादर करणार असून श्री. प्रेमानंद आमोणकर व श्री. सुभाष फातर्पेकर अनुक्रमे तबला सोलो व हार्मोनियम सोलो वादन सादर करणार आहेत. श्री. दयानिधेश कोसंबे, श्री. चारुदत्त गावस, श्री. गीतेश मांद्रेकर, श्री. शुभम नाईक व श्री. सुरज मोरजकर हे कलाकार साथसंगत करणार आहेत.

सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून शास्त्रीय संगीतप्रेमी रसिकांनी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहावे असे कला अकादमी व इन्स्टिटय़ूट मिनेझिस ब्रागांझा तर्फे कळविण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

**सोबतः- फोटो**

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)